**नियमीत दिवाणी दावा क्र. ६९/२०१३ मधील निशाणी क्र. ५ खालील आदेश.**

१. प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त ताकीदी करीता आहे.

२. वादींचे संक्षिप्तमध्ये कथन खालीलप्रमाणे आहे.

२अ. मौजे तरडगव्हाण, ता. शिरूर कासार, जि. बीड येथील व मौजे महांडुळा, हिवरवाडी व रसुलाबाद, ता. गेवराई, जि. बीड येथील दावा मिळकतींचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | गट नं. | क्षेत्र | | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | हे. | आर | रूपये | पैसे |
| १ | ३०९ | ० | ३६ | ० | ८८ |
| २ | १२५ | ० | ४२ | ० | ९७ |
| ३ | १३० | ० | ८१ | १ | २० |
| ४ | १३० | ० | ७५ | १ | ११ |
| ५ | १५६ | ० | ८५ | २ | ४ |

(वरील जमीन मिळकतींना यापुढे 'दावा मिळकती' असे संबोधण्यात येत आहे. दावा मिळकतींच्या चतु:सिमा विस्तृतमध्ये अर्जाच्या परिच्छेद क्र. १ मध्ये दर्शविलेल्या आहेत.)

२ब. वादी व प्रतिवादी यांचे नातेसंबंध अधिक स्पष्ट करणेकरीता त्यांची वंशावळ खालीलप्रमाणे.

नवनाथ (प्र.वादी नं.२)
(प्रमुख)
├── सरस्वती (प्र.वादी नं.३)

सुधाकर (मयत) | शिवाजी (प्र.वादी नं.१)
सत्यभामा (प्र.वादी नं.४) | बिजुताई (वादी नं.१)
| श्रेयश (वादी नं.२)

प्रतिवादी क्र. २ हा कुटुंबाचा कर्ता असुन त्याला मयत सुधाकर व शिवाजी असे दोन मुले आहेत. मयत सुधाकर यास प्रतिवादी क्र. ४ सत्यभामा ही पत्नी आहे व शिवाजी यास वादी क्र. १ बिजुताई ही पत्नी आहे व अज्ञान वादी क्र. २ श्रेयश हा मुलगा आहे. प्रतिवादी क्र. ३ सरस्वती ही कुटुंब प्रमुख नवनाथ यांची पत्नी आहे.

२क. दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांची एकत्र कुटुंबाची मिळकत असुन सदर मिळकती पैकी काही वडीलोपार्जित व काही एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नामधुन खरेदी केलेली मिळकती आहेत व वडीलापपार्जित मिळकत विक्री करून काही नवीन खरेदी केलेली आहे. वादी व प्रतिवादी हे एकत्र कुटुंबाचे सदस्य असून दावा मिळकतीचे आज तागायत त्यांच्यात कुठलेही वाटप झालेले नाही. वादींनी, प्रतिवादी कडे त्यांच्या हिस्याची मागणी केली असता प्रतिवादींनी वाटप करून देण्यास टाळाटाळ केली व दावा मिळकती विक्री करण्याची धमकी दिली. जर दावा मिळकती हया प्रतिवादींनी विक्री केल्या तर वादींना त्यांचा कायदेशिर हक्क मिळण्यास अडचण निर्माण होईल. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकतीचे कसल्याही प्रकारे दाव्याच्या अंतिम निकाल लागेपर्यंत हस्तांतर करू नये तसेच कर्जबोजा करू नये अशा प्रकारचा तुर्तातुर्त मनाई हुकुम वादींच्या हक्कात व प्रतिवादींच्या विरूध्द पारित करण्यात यावा.

३. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि. क्र. १४ वर दाखल केले आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र. १ ते ४ मध्ये सन २००५ मध्येच वाटप झालेले असून ते आपआपल्या हिस्साच्या जमिनी वहिती करीत आहेत. तेव्हा पासुन वादी व प्रतिवादींच्या एकमेकांच्या कुंटुबाशी कसलाही संबंध आला नाही. सबब, वादी हे केवळ प्रतिवादी क्र. १ चे सदस्य होऊ शकतात. वादीने दावा मिळकतीच्या चुकीच्या चतु:सिमा दर्शवल्या

असून अर्ज दाखल करण्यासाठी कुठलेही कारण घडलेले नाही. सबब, वादींचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. उभय पक्षकारांचे म्हणणे विचारात घेता प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकरीता खालील मुद्दे माझ्या निदर्शनास येतात. यापुढे नमुद केलेल्या कारणास्तव त्या मुद्दयांसमोर मी माझे निष्कर्ष देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| (१) वादी सकृत दर्शनी आपली केस सिध्द करतात काय? | ... होय. |
| (२) तौलनिक तराजू वादींच्या बाजुने आहे काय ? | ... होय. |
| (३) वादींच्या मागणीप्रमाणे तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास त्यांची अपरिमित हानी होणार आहे काय ? | ... होय. |
| (४) आदेश काय? | ... अंतिम आदेशानुसार अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |

## :: कारणमिमांसा ::

### मुद्दे क. १ ते ४ च्या संदर्भात :-

५. सदरचे मुद्दे सुसंगत असल्यामुळे सोबत चर्चीले जात आहेत.

६. वादींनी त्यांच्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ काही कागदोपत्री पुरावा

दाखल केलेला असून त्याचा उल्लेख यापुढे योग्य त्या ठिकाणी करण्यात येत आहे.

७. वादीच्या म्हणण्यानुसार, दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांच्या हिंदु एकत्र कुटुंबाची मिळकती असुन त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांच्या प्रत्येकी अविभक्त हिस्सा असून दावा मिळकती वर वादी व प्रतिवादी यांचे एकत्र वहिती आणि ताबा आहे. असे असून सुध्दा दावा प्रलंभित असताना प्रतिवादी क्र. २ ने दावा मिळकत गट नं. १५६ ची मिळकत बालम शेख नावाच्या त्रयस्थ व्यक्तीस कायम खरेदीखताने विक्री केली आहे. दिनांक १६.६.२९२०१४, रोजीच्या खरेदीखताचे (नि.क्र.२०/१) अवलोकन करता दावा मिळकती पैकी गट नं १५६ प्रतिवादी क्र. २ ने हस्तांतरण केल्याचे सकृत दर्शनी दिसुन येत आहे.

८. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या मध्ये २००५ साली वाटप झाले असून ते आपआपल्या हिस्साच्या जमिनी वहिती करीत आहेत व वादी प्रतिवादींच्या एकमेकाच्या कुटुंबाशी कसलाही संबंध राहिलेला नाही. परंतु प्रतिवादीने त्यांच्या म्हणण्याच्या पृष्टयर्थ त्यांच्या झालेल्या तथाकथीत वाटपा संदर्भात कसलाही पुरावा या कामी दाखल केलेला नाही. याउलट वादीने दाखल केलेला दावा मिळकतींचे ७/१२ उतारे (नि.क्र.४/१ ते नि.क्र. ४/४) चे अवलोकन करता दावा मिळकती या अजुनही वादी व प्रतिवादी यांची हिंदु एकत्र कुटूंबाच्या मिळकती असल्याचे सकृत दर्शनी दिसुन येत आहे. वादींना दावा मिळकतीत हिस्सा असल्याचे किंवा नसल्याची बाब ही दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळी विचारात घेण्यात येणारी आहे. परंतु या ठिकाणी दावा मिळकतीत वादीचा कायदेशिर अधिकार असल्याचे सकृत दर्शनी दिसुन येत आहे. प्रतिवादींनी वादींचा संपुर्ण हक्क पुर्णपणे नाकारल्यामुळे त्यांच्याद्वारे मिळकती मध्ये वादींचा हक्क डावलण्याच्या दुष्ट हेतुने दावा मिळकती विक्री करण्याचा उद्देश पुर्णपणे नाकारता येत नाही.

९. वरील विवेचनावरून, वादींनी सकृत दर्शनी आपली केस सिध्द केली आहे. तौलनिक तराजु त्यांच्या बाजुने झुकतो, वादींच्या मागणीनुसार तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. अशा प्रकारे तुर्तातुर्त ताकीद दिल्यास प्रतिवादींची कोणतीही हानी होणार नाही. मागणीप्रमाणे तुर्तातुर्त ताकीद मिळण्यास वादी पात्र आहेत. सबब, मी मुद्दे क्र. १ ते ४ चे निष्कर्ष होकारार्थी देवून खालील आदेश पारीत करीत आहे.

## :: **आदेश** ::

(१) अर्ज (निशाणी क्र. ५) खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

(२) प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत दावा मिळकतीची विक्री, गहान, दान, कर्जबोजा, बक्षिसपत्र, वाटपपत्र व इतर कोणत्याही मार्गाने त्रयस्थ व्यक्तीस हस्तांतरण करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम त्यांच्या विरूध्द देण्यात येत आहे.

(३) या अर्जाचा खर्च अंतिम निकालावर अवलंबुन राहील.

सही/-६.०९.२०१४.

ठिकाण : शिरूर कासार.
दिनांक : ६.०९.२०१४.

( आर.पी. यादव)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिरूर का.